# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- २४१
**(सभावृत्तांत)**

**दिनांक- २२/०९/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **२२/०९/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

१. **मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.संतोष बबन कांबळे
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.बुर्डे सुवर्णा विकास
७. मा.फुगे भिमाबाई पोपट
८. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
९. मा.सुलक्षणा राजू धर
१०. मा.सुजाता सुनिल पालांडे
११. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
१२. मा.यादव मीनल विशाल
१३. मा.भालेकर प्रविण महादेव
१४. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१५. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.ढाकणे- अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.भोसले मुख्यलेखा परिक्षक, मा.राजन पाटिल- शहर अभियंता, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.लोणकर, मा.चारठाणकर, मा.खोत, झगडे, दुरगुडे- उप आयुक्त, मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.भालकर, मा.तांबे, मा.कुलकर्णी- सह शहर अभियंता, मा.लडकत- प्र.सह.शहर अभियंता, मा.आगळे, मा.जोशी, मा.देशमुख, मा.दांगट, मा.खांडेकर, मा.थोरात, मा.गायकवाड- सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.वाबळे- अधिष्ठता वाय.सी.एम.एच., मा.गट्टुवार, मा.पवार, मा.सिनकर, मा.देसले, मा.औंबासे, मा.वाघुंडे, मा.लडकत, मा.महाजन, मा.देशमुख, मा.गलबले,

मा.मोरे- कार्यकारी अभियंता, मा.जगताप- कामगार कल्याण अधिकारी, मा.गोफणे- सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

(गणेशोत्सवातील नियोजन उत्तम प्रकारे केल्याबद्दल मा.आयुक्त यांचे आणि मा.सुजाता पालांडे यांचे मा.स्थायी समिती सदस्यपदी निवड झाल्याने सभागृहाच्या वतीने मा.सभापती यांनी अभिनंदन केले.)

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

विषय क्र.३३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे रहाटणी, वाकड, चिखली, पिंपळे गुरव येथील रस्त्याने व आरक्षणाने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने मनपाच्या ताब्यात घेणेबाबत.

विषय क्र.३४) कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्णांना व नियुक्त कर्मचारी यांना जेवन व नाष्टा उपलब्ध करुन देणेबाबत(मे.सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या.).

विषय क्र.३५) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील कामांच्या तरतुदीमध्ये वाढ/ घट करणेबाबत.- मा.संतोष कांबळे व मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३६) पिंपरी चिंचवड शहराच्या मा.महापौर यांचेमानाचे पद विचारात घेवून त्यांचे दौ-याकरीता आणि प्रसिद्धीकरीता एक फोटोग्राफर व एक स्वीय सहाय्यक स्वतंत्र कर्मचारी वर्ग यांना नगरसचिव विभागांतर्गत देणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३७) सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये वर्गीकरण करणेबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) सन २०२०-२१ चे सुधारित व सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील "विशेष योजना" या लेखाशिर्षकातील प्रभाग क्र.२५ वाकड, पुनावळे, ताथवडे मधील चालू विकास कामाला वाढीव तरतूद मिळणेबाबत.- मा.फुगे भिमाबाई व मा.बुर्डे सुवर्णा यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३९) समुह संघटक मानधनावर नेमणुकीबाबत.- मा.कांबळे अंबरनाथ व मा.फुगे भिमाबाई यांचा प्रस्ताव.

-------------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२४० दि.१५/०९/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक- १०३०३ विषय क्रमांक- ०१

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- आरोग्य मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/३/कावि/१५६/२०२१, दि.०९/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या १०५ प्राथमिक शाळा, माध्यमिक विभागाचे १८ माध्यमिक विद्यालय व मनपाचे २ औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय) येथे मनुष्यबळाद्वारे वर्ग खोल्या साफसफाई करणेकामी १८६ कामगार, यांत्रिकी पध्दतीने शौचालय व मुता-या साफसफाई करणे कामासाठी ४६ कामगार व क्षेत्रीय कार्यालयानुसार 9 सुपरवायजर पुरविणे या कामासाठी २ वर्षे कालावधीकरिता आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत निविदा नोटीस क्र.०८/२०१८-१९ प्रसिध्द करुन मे.ब्रिस्क इंडिया प्रा.लि. यांचे लघुत्तम दर**(L-1)** सादर केलेला निविदा अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ०.०८% ने जास्त दर स्वीकृत करुन कामकाज आदेश देणेत आलेला आहे. सदर निविदेची मुदत दि.३१/०७/२०२१ रोजी संपुष्ठात आलेली असुन, नविन निविदेची कार्यवारी सुरु आहे. याकामकाजाकरीता अंदाजे 1.5 महिना कालावधी लागणार असलेने, तोपर्यंत मुदतवाढ देवून याकामी येणा-या र.रु.1,09,54,834/- (अक्षरी र.रु.एक कोटी नऊ लाख चोपन्न हजार आठशे चौतीस) इतके अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास 1.5 महिना कालावधीकरीता तथा निविदा प्रक्रिया पुर्ण होवून प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल यापैकी जे प्रथम होईल तसेच महाराष्ट्र शासनामार्फत किमान वेतन कायद्यानुसार वेळोवेळी होणा-या वेतनातील बदलानुसार वेतन अदा करणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३०४ विषय क्रमांक- ०२

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य फ मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/५९४/२०२१, दि.०९/०९/२०२१.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.11/04/2021-2022 अन्वये प्रभाग क्र.१ मधील रामदासनगर पाटीलनगर धर्मराजनगर परिसरातील अंतर्गत भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे व दुरूस्ती करणे कामी मे.गुप्ता कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,98,670/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणतीस लाख अठ्ठयान्नव हजार सहाशे सत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,82,070/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,82,070/- पेक्षा 36.50% कमी म्हणजेच र.रु.18,93,614/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.1,413/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,600/- = एकुण र.रु.19,11,627/- (अक्षरी र.रु.एकोणावीस लाख अकरा हजार सहाशे सत्तावीस फक्त) पर्यंत काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा

अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३०५ विषय क्रमांक- ०३

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ड मुख्य

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/ड-मुख्य/५०४/२०२१, दि.०९/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/16/01/2021-22 अन्वये प्र.क्र.२५ पुनावळे व प्रभागतील इतर रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे कामी एच डी असोशिएट्स नि.र.रू.82,11,108/- (अक्षरी रक्कम रुपये ब्याऐंशी लाख अकरा हजार एकशे आठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.81,36,758/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.81,36,758/- पेक्षा 41.9% कमी म्हणजेच र.रु.47,27,456/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.15,123/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.74,350/- = एकुण र.रु.48,16,929/- (अठ्ठेचाळीस लाख सोळा हजार नऊशे एकोणतीस फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३०६ विषय क्रमांक- ०४

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/८५५/२०२१, दि.०९/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असलेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना-१९ च्या तिस-या

लाटेचा संभाव्य धोका लक्षात घेऊन EOI/०८/२०२१-२२ अन्वये प्रसिध्द करणेत आला होता. सदर ईओआय मध्ये सीसीसी, आयसीयु, आणि ऑक्सीजन युक्त बेड साठी मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त निविदाकारांचे पटल (Empanelment) तयार करणेत आले होते. आयसीयु साठी १०, १५ आणि ५० बेडसाठी दर मागविणेत आले होते. या मध्ये मे.आयकॉन हॉस्पिटल यांचे १५ बेडसाठी र.रु.४९७८/- प्रति बेड प्रती दिन असे दर प्राप्त झाले आहेत. या कामी Empanelment तयार करणेकामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०२०७ दि.०१.०९.२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. वरील प्रमाणे थेरगाव रुग्णालयातील १५ बेडस चा पॅकेजच्या दराने १४ आयसीयु बेडसचे दोन पॅकेज करीता EOI अटी शर्ती नुसार एकुण २८ आयसीयु बेडसचे काम चालु करणेकामी मे.आयकॉन हॉस्पिटल यांना आदेश देणेत आले आहेत. सदर कामकाज आदेशासाठी EOI मधील अटी शर्ती लागु राहणार आहेत. आयसीयु पहिल्या पॅकेजसाठी र.रु.६२,७२,२८०/- आणि दुसऱ्या पॅकेजसाठी र.रु.६२,७२,२८०/- असा एकूण र.रु.१,२५,४४,५६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी पंचवीस लाख चव्वेचाळीस हजार पाचशे साठ फक्त) खर्च येणार आहे. सदर कामाचा कालावधी दि.१०.०९.२०२१ ते ०९.१२.२०२१ पर्यंत राहणार आहे. त्याकामाचा येणा-या प्रत्यक्ष खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३०७ विषय क्रमांक- ०५

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- विद्युत फ क्षेत्रिय कार्या.

सुचक- मा.बारणे अभिषेक अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/५१५/२०२१,दि.०७/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.2 चिखली मधील सुलभ शौचालय बांधणेत आलेले आहे. सदर इमारतीस विज पुरवठा करणेकामी म.रा.वि.वि.कं.स अर्ज क्र.32328667. दि.08.07.2021 अन्वये कळवणेत आलेले आहे. त्यानुसार म.रा.वि.वि.कं कडून लघु दाब विज पुरवठा करणेकामी नविन विजमीटरसाठी रक्कम रू.8,898/- इतक्या रक्कमेचे फर्म कोटेशन प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे म.रा.वि.वि.कं.लि.कं.कडून प्राप्त फर्म कोटेशनचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | वीजमीटरचे ठिकाण | ग्राहक क्रमांक | फर्म कोटेशन क्रमांक व दिनांक | निव्वळ देय |
|---|---|---|---|---|
| 1 | सुलभ शौचालय,चिखली चौक, तलाठी ऑफीस जवळ,बस स्टँड,पिंपरी-411062. | 170104931335 | क्रमांक :- 17960170<br>दिनांक :- 13/10/2021 | 8898/- |

उपरोक्त नमुद ठिकाणी वीजमीटर बसविणे कामी फर्म कोटेशन नुसार र.रु.8898/- (अक्षरी र.रु. आठ हजार आठशे अठ्ठ्याण्णव फक्त) अदा करणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने कळविले आहे.सदरची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. तरी,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांस र.रु.8,898/- (अक्षरी आठ हजारआठशे अठ्ठ्याण्णव रुपये फक्त) अदा करणेस व सदरचा खर्च विद्युत क कार्यालयाकडील नवीन वीज मिटर या लेखाशिर्षामधून करणेस तसेच सदर इमारतीचे दरमहा येणार वीजबिल महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस अदा करणे आवश्यक असल्याने सदरचे बिल क क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील वीजबिले या लेखाशिर्षामधून अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३०८ विषय क्रमांक- ०६

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- लेखा

सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/११/कावि/९५८/२०२१,दि.१३/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयकर, टी.डी.एस., व्यवसाय कर, वस्तू व सेवा कर, वस्तू व सेवा कर (टी.डी.एस) यांचे विवरण पत्र दाखल करणे व सदर करांसंबंधी व आर्थिक व्यवहार विषयक करसल्लागार म्हणून दि.१/४/२०२१ ते दि.३१/३/२०२२ या कालावधीसाठी नेमणूक करणेसाठी कोटेशन क्रमांक.१/२०२१-२२ मनपा वेबसाईटवर दि.३०/७/२०२१ ते दि.५/८/२०२१ या कालावधीत प्रसिध्द केले होते. त्यास अनुसरुन एकूण ५ संस्थांनी कोटेशन सादर केले असून कागदपत्रांची छाननी केली असता त्यातील ३ सनदी लेखापाल संस्था पात्र झाल्या असून त्यांनी सादर केलेल्या दरपत्रकाचे अवलोकन केले असता चिंगळे ॲन्ड असोसिएटस यांनी उपरोक्त नमुद कामांसाठी वार्षिक र.रु.६,६०,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख साठ हजार फक्त) इतका लघुत्तम दर सादर केला आहे. सदर दर स्विकृत्त करणे त्यांचेशी करारनामा करून त्यांची सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी कर सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच सदर खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३०९ विषय क्रमांक- ०७

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२९४/२०२१, दि.०९/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादूर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संस्थात्मक विलगीकरण(Institutional Quarantine), Covid Care Centre आणि मनपा दवाखाने/ रुग्णालयांमधील कोविड19 या साथरोगावर उपचार घेणा-या रुग्णांसाठी किंवा पिंपरी चिंचवड महानगपालिका क्षेत्रात आवश्यकता भासेल तेथे तसेच आवश्यकतेनुसार सदर केंद्रांवर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची भोजन व नाष्ट्याची व्यवस्था करणेसाठी ई निविदा सूचना क्रमांक.28/2021-22 अन्वये

लघुत्तम निविदाकार मे.हॉटेल एंपायर गार्डन, पिंपरी यांचे लघुत्तम दर रुपये 174/- प्रति दिन प्रति व्यक्ति व्यक्ती हे अंदाजपत्रकीय दर रुपये 230/- पेक्षा 24.34% कमी असल्यामुळे सदरचे प्राप्त दर मा.आयुक्त व मुलेप यांनी स्विकृत केलेले आहेत. Covid Care Center व Institutional Quarantine Center येथे आदेशाचे तारखेपासून रुपये 174/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादार ज्या दिवशी प्रति दिन दुपारच्या अथवा रात्रीच्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा करतील त्यानुसार कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन जेवण व नाष्ट्याचे पुरवठ्यासाठी पुरवठादार यांना अदा कराव्या लागणा-या रुपये अंदाजे 2000 व्यक्तींकरीता एकूण र.रु.1,04,40,000/- (अक्षरी र.रु. एक कोटी चार लाख चाळीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे.हॉटेल एंपायर गार्डन, पिंपरी यांचे बरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१० विषय क्रमांक- ०८

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२९५/२०२१,दि.०८/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक.10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.18/04/2021 अखेर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.19/04/2021 पासून रुपये230/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे /रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.३१,६४,११०**/-** (अक्षरी र.रु.एकतीस लाख चौसष्ठ हजार एकशे दहा फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे. सावित्री महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३११ | विषय क्रमांक- ०९

दिनांक- २२/०९/२०२१ | विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र. मभां/१५/कावि/२९३/२०२१, दि.०८/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम १८९७ सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.१४/०३/२०२० आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम (४१ व ५०) महानगरपालिका अधिनियम कलम ७३(६) व कलम ६७(३)(क) नुसार कोरोना विषाणूचा(कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या कोविड केअर सेंटर व कॉरंटाईन सेंटर येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना वमनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टाउपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक.१०/२०२०-२१ अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये १८०/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण १५ पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.१८/०४/२०२१ अखेर र.रु.१८०/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.१९/०४/२०२१ पासून रुपये २३०/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/ रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.३,१३,७२०/- (अक्षरी र.रु.तीन लाख तेरा हजार सातशे वीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेले पुरवठादार मे. हॉटेल राजवर्धन यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१२ | विषय क्रमांक- १०

दिनांक- २२/०९/२०२१ | विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/२९६/२०२१, दि.०९/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि.14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपा मार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक.10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.18/04/2021 अखेर र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति व दि.19/04/2021 पासून रुपये 230/- प्रति दिन प्रति व्यक्ती याप्रमाणे सबंधित

पुरवठादारांनी प्रति दिन दुपारचे/ रात्रीचे यापैकी ज्या वेळेस कमाल जेवणाचा पुरवठा केलेला आहे त्यानुसार सबंधित कोविड केअर सेंटरचे पाक्षिक अहवाल विचारात घेऊन विषयाच्या सविस्तर तपशिलामध्ये नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रु.18,36,780/- (अक्षरी र.रु.अठरा लाख छत्तीस हजार सातशे ऐंशी फक्त) चे खर्चास मान्यता व पुरवठादार मे.जोशी बंधू केटरर्स यांचे बरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१३ विषय क्रमांक- ११

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग-

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र.४५ दि.०९/०९/२०२१.

मा.महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेप्रमाणे.

आत्मिक शक्ती वृद्धिगत करुन जनमाणसात नवचैतन्य जागृत करणारा जागर स्त्री शक्तीचा सर्वांगिण विकास, तणावमुक्ती व सृजनशीलतेला वाव देण्यासाठी आपल्या मार्फत व आपल्या आखत्यारित न्यासा ह्युमन डेव्हलपमेंट आणि रिसर्च सेंटरने उपक्रम हाती घेण्याची इच्छा दर्शविली आहे. खालील विषयी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या म्युझिक हिलर, सक्सेस कोच, आय.टी.उद्योजिका साधना योगलक्ष्मीजी या प्रशिक्षण देणार आहेत. त्या वरिल संस्थेच्या संस्थापिका आहेत.

| अ.क्र. | तपशील | मानधन |
|---|---|---|
| १. | **" जागर स्त्री शक्तीचा"** कार्यक्रम<br>**१**) स्वच्छता जागृती व आंतरिक संतुलन (वेळ १तास ३० मिनीट)<br>**२**) तणावमुक्ती (वेळ ३० मिनीट)<br>**३**) ध्येय निश्चिती (वेळ ३० मिनीट)<br>**४**) आत्मनिर्भरता (वेळ ३० मिनीट)<br>**५**) संगीत साधना (वेळ १ तास)<br>(अर्धा तासाचा ब्रेक असेल) | **५,६६,०००/-** |
| | लागणारे अंदाजे खर्च – (मान्यवरांचे मानधन, प्रवास खर्च, साऊंड इंजिनिअर साऊंड सिस्टीम, ३ म्युजिशियन, आयोजक आणि स्वयंमसेवक) | |

खालील प्रमाणे-

१) दिव्यांग/शेतकरी कुटुंब तणावमुक्ती.

२) किशोरवयीन मुली/महिलांना संगीतातून समूपदेशन.

३) मुलींची तांत्रिक/व्यावसायिक कौशल्यवृद्धी.

४) ग्रामीण भागातील मुलींचे स्वसंरक्षण, आत्मसन्मान व मनोबल वाढविणे.

यासाठी जागर शक्तीचा हा कार्यक्रम आयोजित करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१४ विषय क्रमांक- १२
दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/३३९/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र "अ" (१ ते ४६) मधील निविदा कामांचे अवलोकनहोवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्येझालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीसअधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१५ विषय क्रमांक- १३
दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- पाणीपुरवठा
सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/सशअ/तांमा/०३/२०२१, दि.१४/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील नागरीकांना पायाभूत सुविधा पुरविणेकामी महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामे चालू आहेत. सदर कामांतर्गत रस्ते, पूल, इमारती, पाणीपुरवठा प्रकल्प, मलनिःसारण प्रकल्प, किरकोळ देखभाल दुरूस्ती इ. विविध प्रकारच्या कामांचा समावेश आहे. सदर विकास कामांचा दर्जा व गुणवत्ता योग्य मानांकाप्रमाणे राखणेसाठी महानगरपालिकेने यापुर्वीच सन २००५ मध्ये मे.एस.जी.एस.इंडिया लि. व R I T E S या आय.एस.ओ.९००१ प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या त्रयस्थ संस्थेची नेमणूक केली आहे. सदर संस्थेमार्फत पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाकडील कामांची पाईप व इतर साहित्याची गुणवत्ता तपासणी करणेत येते व त्यासाठी संबंधित ठेकेदारामार्फत त्याची फी अदा करण्यात येते. सद्यस्थितीत मा. शहर अभियंता कार्यालयाकडील तसेच बी.आर.टी.एस. विभागाकडील कामांची S.G.S व I.R.S या त्रयस्थ संस्थांमार्फत चालु कामांची तपासणी करण्यात येते व निविदा रकमेच्या ०.४०% या दराने त्याची तपासणी फी महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात येते. सद्यस्थितीत चालू व नियोजित कामांची व्याप्ती लक्षात घेता S.G.S. व्यतिरिक्त त्यांचे सारखेच काम करणारी एखादी संस्था पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाकडील विकास कामांची गुणवत्ता तपासणीकामी असणे आवश्यक आहे. Quality Services & Solutions (QSS) या संस्थेने याकामी पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागास त्यांचेकडील अर्ज दि.२१/०६/२०१८ व दि.१७/०२/२०२१ रोजी सादर केले आहेत. सदर संस्था भारतामध्ये अश्या प्रकारच्या कामांकरिता Third Party Inspection म्हणून कार्यरत आहेत. या संस्थेची एकूण २९ कार्यालये भारतात आहेत.सद्यस्थितीत Quality Services & Solutions (QSS) ही संस्था MIDC, पुणे, नाशिक, ठाणे, कल्याण, नागपूर, औरंगाबाद, सांगली-मिरज-कुपवाडा महानगरपालिका तसेच जल स्वराज्य व पेट्रोलियम एवं प्राकृतिक गॅस विनियामक बोर्ड इ. विविध ठिकाणी विविध क्षेत्रात Third Party Inspection करत आहे व त्यांचेकडे त्याची मान्यता देखील आहे. Quality Services & Solutions (QSS) या संस्थेने अद्यापपर्यंत ज्या ठिकाणी ThirdParty Inspection चे कामकाज केले आहे. त्याचे स्वरूप

पुढील प्रमाणे आहे.

1. सर्व प्रकारचे पाईप
   a. MDPE, PVC, HDPE,
   b. GI, SS, ERW, NPII, NPIII
2. सर्व प्रकारचे पंप व पाण्याचे मीटर
3. कंट्रोल पॅनलस्
4. पावर ट्रान्सफोरमर्स
5. मटेरीयल खरेदी व त्याचे परिक्षण

Quality Services & Solutions (QSS) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी देखील गुणवत्ता व दर्जा तपासणीचे काम त्रयस्थ संस्था म्हणुन काम करायची तयारी दर्शविली आहे. तसेच QSS संस्था महानगरपालिकेच्या मान्य QAP नुसार मटेरियल Testing व Activy इ.कामे नियमितपणे करून त्याचे प्रत्येक आठवड्याला Review (आढावा) साठी मा.सह शहर अभियंता यांचेकडे अहवाल सादर करणार आहेत. सदर संस्थेलादेखील S.G.S. या संस्थेस देय असलेल्या फी नुसार म्हणजेच निविदा रक्कम अथवा निविदा दरासह येणारी रक्कम यापैकी जी कमी असेल, त्या रकमेच्या ०.२०% अधिक टॅक्स (शासकीय नियमाप्रमाणे) या दराने फी अदा करावी लागणार आहे. सदरची बीले ही त्या कामाच्या तरतूदीमधूनच करणेत येतील. उपरोक्तनुसार Quality Services & Solutions (QSS) संस्थेस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व जलनिःसारण विषयक कामांची गुणवत्ता तपासणी करणेकामी त्रयस्थ संस्था म्हणून (Third Party Inspection) नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रायोगिक तत्वावर पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाच्या सन २०२१-२२ च्या बजेट मधील ज्या कामांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणुक केलेली नाहीत अशी कामे या संस्थेस तपासणीसाठी देणे आवश्यक आहे. तरी Quality Services & Solutions (QSS) या खाजगी संस्थेची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व जलनिःसारण विभागाच्या विकास कामांचा दर्जा व गुणवत्ता तपासणी साठी त्रयस्थ संस्था म्हणून (Third Party Inspection) नेमणूक करणेस व त्यांना निविदा रक्कम अथवा निविदा दरासह येणारी रक्कम यापैकी जी कमी असेल, त्या रकमेच्या ०.२०% अधिक टॅक्स (शासकीय नियमाप्रमाणे) या दराने फी अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१६ — विषय क्रमांक- १४

दिनांक- २२/०९/२०२१ — विभाग- स्थापत्य अ मुख्य

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ — अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.अति आयुक्त(१)यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२२१/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.अति आयुक्त(१)यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.15/6/2021-22 अन्वये प्रभाग क्रं.१५ भागातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. कामी M/s.BAHIRAT BROTHERS नि.र.रू.81,99,863/- (अक्षरी र.रु.एक्याऐंशी लाख नव्यानव हजार आठशे त्रैसष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.81,31,213/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.81,31,213/- पेक्षा 37.88% कमी म्हणजेच र.रु.50,51,110/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.8,794/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.68,650/- = एकुण र.रु.51,28,554/- (अक्षरी र.रु.एकावण्ण लाख अठ्ठावीस हजार पाचशे चोपन्न फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील

निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१७ विषय क्रमांक- १५

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य अ मुख्य

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.अति आयुक्त(१)यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२२०/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.अति आयुक्त(१)यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.15/7/2021-22 अन्वये प्रभाग क्र.१४ मध्ये आकुर्डी व परिसरातील स्टॉर्म वॉटर, फुटपाथ विषयक कामे करणे कामी M/s.PRISM ENTERPRISES नि.र.रू.57,83,318/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तावन्न लाख त्र्याऐंशी हजार तिनशे अठरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.57,63,218/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.57,63,218/- पेक्षा 36.56% कमी म्हणजेच र.रु.36,56,185/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.16,138/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.20,100/- = एकुण र.रु.36,92,423/- (अक्षरी र.रु.छत्तीस लाख ब्याण्णव हजार चारशे तेवीस फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१८ विषय क्रमांक- १६

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- भूमि आणि जिंदगी

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.बारणे अभिषेक

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुमि/३/कावि/३५/२०२१, दि.०६/०९/२०२१.

विषय- ग क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्र.क्र.२३ थेरगाव येथील पडवळ नगर व दगडू पाटील नगर येथील बीफ मांस विक्रीची दुकाने स्थालांतरीत करणेबाबत.

(विषय क्र.१६चा विचार पुढील सभेचेवेळी करण्यात यावा.)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३१९ विषय क्रमांक- १७

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/८७२/२०२१, दि.१४/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीयसाथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा२००५, महानगरपालिका अधिनियम कलम63(6) वकलम67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असलेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना-१९ च्या तिस-या लाटेचा संभाव्य धोका लक्षात घेऊन EOI/०८/२०२१-२२ अन्वये प्रसिध्द करणेत आला होता. सदर ईओआय मध्ये सीसीसी, आयसीयु, आणि ऑक्सीजन युक्त बेड साठी मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त निविदाकारांचे पटल (Empanelment) तयार करणेत आले होते. सीसीसी साठी ५०, १००, २०० आणि ३०० बेडसाठी दर मागविणेत आले होते. या मध्ये मे.आयकॉन हॉस्पिटल यांचे २०० बेडसाठी र.रु.३९४/- प्रति बेड प्रती दिन असे लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. या कामी Empanelment तयार करणेकामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०२०७ दि.०१.०९.२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. वरील प्रमाणे एक कोविड केअर सेंटर चालु करणेकामी आदेश देणेत आले आहेत. सदर कामकाज आदेशासाठी EOI मधील अटी शर्ती लागु राहणार आहेत. सदर आदेश दि.१५.०९.२०२१ ते दि.१३.१२.२०२१ पर्यंत राहणार आहेत. चिखलीघरकुल, इमारत क्र.बी-१० साठी एकूण र.रु.७०,९२,०००/-(अक्षरी र.रु.सत्तर लाख ब्याण्णव हजार फक्त) इतका खर्च येणार आहे व प्रत्यक्ष येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२० विषय क्रमांक- १८

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८९०/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.18/15/2021-22 अन्वये प्रभाग क्र.20 एम आय डी सी तील जनरल ब्लॉक मधील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.सुजाता कन्स्ट्रक्शन नि.र.रू.44,98,527/- (अक्षरी र.रु.चौव्वेचाळीस लाख अठ्ठ्याण्णव हजार पाचशे सत्तावीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,24,777/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,24,777/- पेक्षा 42.3% कमी म्हणजेच र.रु.25,53,096/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.51,306/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.26,78,152/- (अक्षरी र.रु.सव्वीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार एकशे बावण्ण फक्त ) पर्यंत काम करुन

घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२१ विषय क्रमांक- १९

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८९२/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.18/14/2021-22 अन्वये प्रभाग क्र.20 एम आय डी सी तील जनरल ब्लॉक मधील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे कामी मे.सुजाता कन्स्ट्रक्शन नि.र.रू.44,99,774/- (अक्षरी र.रु.चौव्वेचाळीस लाख नव्व्याण्णव हजार सातशे चौ-याहत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.44,26,024/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.44,26,024/- पेक्षा 42.2% कमी म्हणजेच र.रु.25,58,242/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.51,306/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.73,750/- = एकुण र.रु.26,83,298/- (अक्षरी र.रु.सव्वीस लाख त्र्याऐंशी हजार दोनशे अठ्ठ्याण्णव फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२२ विषय क्रमांक- २०

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य इ मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/४४८/२०२१, दि.१५/०९/२०२१.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.33/20/2021-22अन्वये प्रभाग क्र.७ मध्ये आवश्यक ठिकाणी स्थापत्य विषयक दुरुस्ती व देखभालची कामे करणेकामी मे.सुजाता कन्स्ट्रक्शन नि.र.रू.37,47,544/- (अक्षरी रक्कम रुपये सदोतीस लाख सत्तेचाळीस हजार पाचशे चौव्वेचाळीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.37,35,844/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.37,35,844/- पेक्षा 41.01% कमी म्हणजेच

र.रु.22,03,774/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.13,119/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.11,700/- = एकुण र.रु.22,28,593/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२३ विषय क्रमांक- २१

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२१८/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.71/1/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१० मधिल महात्मा ज्योतिराव फुले पुतळ्या शेजारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व स्मारकाचे सुशोभिकरण करणे करीता स्थापत्य विषयक कामे करणे. कामी M/s.HIGHWAY CONSTRUCTION नि.र.रू.10,99,14,536/- (अक्षरी र.रु.दहा कोटी नव्यान्नव लाख चौदा हजार पाचशे छत्तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.10,98,76,886/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.10,98,76,886/- पेक्षा 12.25% कमी म्हणजेच र.रु.9,64,16,967/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.1,84,162/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.37,650/- = एकुण र.रु.9,66,38,779/- (अक्षरी र.रु.नऊ कोटी सहासष्ठ लाख अडोतीस हजार सातशे एकोणऐंशी फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२४ विषय क्रमांक- २२

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२१९/२०२१, दि.१३/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.71/2/2020-21 अन्वये प्रभाग क्र.१० मधिल महात्मा ज्योतिराव फुले पुतळ्या शेजारी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व

म्युरल बसविणे. कामी M/s.KALASANSKAR ART STUDIO नि.र.रू.5,58,82,265/- (अक्षरी र.रु.पाच कोटी अठ्ठावन्न लाख ब्याऐंशी हजार दोनशे पासष्ठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.5,58,82,265/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.5,58,82,265/- पेक्षा 12.68% कमी म्हणजेच र.रु.4,87,96,394/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.0/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.4,87,96,394/- (अक्षरी र.रु.चार कोटी सत्याऐंशी लाख शहाण्णव हजार तीनशे चौ-याण्णव फक्त) पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२५ विषय क्रमांक- २३

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- स्थापत्य अ मुख्यालय

सुचक- मा.बुर्डे सुवर्णा अनुमोदक- मा.फुगे भिमाबाई

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/अ-मुख्य/२२१/२०२१, दि.१५/०९/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभाग अ मुख्यालयाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (1 ते 9) मधील कामांचे नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे संबंधित ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२६ विषय क्रमांक- २४

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- विद्युत क क्षेत्रिय

सुचक- मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति. आयुक्त(१) यांचे पत्र क्र.कक्षेका/वि/जा/५३०/२०२१, दि.१५/०९/२०२१.

मा.अति. आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामधे कोरोना वीषाणूचा प्रादूर्भाव रोखणेसाठी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ‘क’ क्षेत्रिय कार्यालयामार्फत गवळीमाथा येथील क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, भोसरी येथे कोविड– १९ लसीकरण व तपासणी केंद्र दि.२०/०४/२०२१ पासून सुरु करणेत आलेले आहे. सदर इमारतीमधील विद्युत यंत्रणा, संबंधीत देखभाल दुरुस्ती, वीजबील, जनित्रसंच डिझेल याबाबतचे कामकाज करणेबाबत मा.क्षेत्रिय अधिकारी, ‘क’ क्षेत्रिय कार्यालय यांनी या विभागास

कळविले आहे. सदरचे इमारतीचा वीजमीटर “द चेअरमन क्वालिटी सर्कल टेक ट्रेनिंग, J/P-10 MIDC” यांचे नावे आहे. सदर इमारतीचा वापर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कोविड - १९ लसीकरण केंद्र व तपासणी केंद्राकरीता केलेला आहे. सदर इमारतीचे माहे जुलै २०२१ ते ऑगस्ट २०२१ चे र.रु.५३,४६०/- (अक्षरी र.रु.त्रेपन्न हजार चारशे साठ फक्त) इतके वीजबील मनपा मार्फत अदा करणे आवश्यक आहे. तसेच सदर इमारतीचा वीजपुरवठा खंडीत होऊ नये याकरीता सदरचे वीजबील म.रा.वि.वि.कं.लि. यांस अदा करणे क्रमप्राप्त व आवश्यक आहे. सदर वीजबील भरणेकरीता मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२७ विषय क्रमांक- २५

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- वैद्यकीय

सुचक- मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/८७०/२०२१, दि.१४/०९/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असलेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये कोरोना-१९ च्या तिस-या लाटेचा संभाव्य धोका लक्षात घेऊन EOI/०८/२०२१-२२ अन्वये प्रसिध्द करणेत आला होता. सदर ईओआय मध्ये सीसीसी, आयसीयु, आणि ऑक्सीजन युक्त बेड साठी मनुष्यबळ पुरविणेकामी निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यामध्ये प्राप्त निविदाकारांचे पटल (Empanelment) तयार करणेत आले होते. आयसीयु साठी १०, १५ आणि ५० बेडसाठी दर मागविणेत आले होते. या मध्ये मे.आयकॉन हॉस्पिटल यांचे १५ बेडसाठी र.रु.४९७८/- प्रति बेड प्रती दिन असे दर प्राप्त झाले आहेत. या कामी Empanelment तयार करणेकामी मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०२०७ दि.०१.०९.२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे. वरील प्रमाणे ह.भ.प.कै.प्रभाकर मल्हारराव कुटे मेमोरियल हॉस्पिटल आकुर्डी रुग्णालयातील १५ बेडसचा पॅकेजच्या दराने १४ आयसीयु बेडसचे एक पॅकेज करीता EOI अटी शर्ती नुसार एकुण १४ आयसीयु बेडसचे काम चालु करणे कामी डॉ.जे.के.व्हेनचर्स यांना आदेश देणेत आले आहेत. सदर कामकाज आदेशासाठी EOI मधील अटी शर्ती लागु राहणार आहेत. आयसीयु पॅकेजसाठी एकूण र.रु.६२,७२,२८०/- (अक्षरी र.रु.बासष्ठ लाख बाहत्तर हजार दोनशे ऐंशी फक्त) इतका खर्च येणार आहे. सदर कामाचाकालावधी दि.१६.०९.२०२१ ते दि.१४.१२.२०२१ पर्यंत राहणार आहे. त्या कामाचा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०३२८ विषय क्रमांक- २६

दिनांक- २२/०९/२०२१ विभाग- इ क्षेत्रिय

सुचक- मा. बापू उर्फ शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.इक्षेका/नि-६/कावि/३६४/२०२१, दि.१५/०९/२०२१.

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

